प्रति,
मा. प्राचार्य
लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी.

# :: क्रीडा अहवाल ::

## सत्र २०२४-२०२५

दरवर्षीप्रमाणे सत्र २०२४-२०२५ मध्ये ही लोकमान्य टिळक वरिष्ठ महाविद्यालयातील क्रीडा विभागाची यशस्वी कामगिरी सुरू राहिली. सत्र सुरू झाल्याबरोबर क्रीडा विभागातद्वारा आपले कार्य सुरू करण्यात आले. सत्र २०२४-२०२५ मध्ये दिनांक २९ ऑगस्ट २०२४ रोजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित लोकमान्य टिळक महाविद्यालय तर्फे **विदर्भस्तरीय आजादी की दौड** ह्या ५ किलोमीटर रोड रेसचे आयोजन करण्यात आले.यात मुले व मुली अशा दोन गटांत व दोन वयोगटात ही स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेत संपूर्ण विदर्भातून वेगवेगळ्या जिल्ह्यातून १९०० खेळाडूंनी नोंदणी केली. या विजेत्या खेळाडूंना रोख पारितोषिकासह सन्मानचिन्ह व प्रशस्तिपत्र देण्यात आले.

यानंतर १९.०९.२०२४ ते २२.०९.२०२४ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा आयोजित अंतर महाविद्यालय मुलींच्या व्हॉलीबॉल स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. दिनांक १९.०९.२०२४ ते २२.०९.२०२४ या कालावधीत ही स्पर्धा लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी द्वारा शासकीय मैदान वणी येथे घेण्यात आल्या व यशस्वीरित्या पार पडण्यात आल्या.

दिनांक १८.०२.२०२५ ते २५.०२.२०२५ पर्यंत दरवर्षीप्रमाणे यावर्षी सत्र २०२४-२०२५ मध्ये पण क्रीडा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले. यात क्रिकेट (मुले/मुली), कबड्डी (मुले/मुली), व्हॉलीबॉल (मुले/मुली), बॅडमिंटन (मुले/मुली), अश्या महाविद्यालयीन स्पर्धा शिक्षण प्रसारक मंडळ, वणी चे चिखलगाव स्थित मैदानावर घेण्यात आले. या स्पर्धांमध्ये एकूण महाविद्यालयातील बी.ए., बी.कॉम., बी.एस.सी. एम.ए. एम.कॉम., एम.एस.सी. च्या सर्व वर्ग मिळून जवळपास ३८ संघ सहभागी झाले तसेच बॅडमिंटन या खेळाच्या स्वतंत्र स्पर्धा या महाविद्यालयाच्या सभागृहात घेण्यात आल्या. या सोबतच बुद्धिबळ (चेस) (मुले/मुली) व कॅरम (मुले/मुली) ह्या पण स्पर्धांचे यशस्वी आयोजन करण्यात आले खेळाडू विद्यार्थ्यांना सन्मानचिन्ह देऊन

यासोबतच दरवर्षीप्रमाणे महाविद्यालयाचे अनेक विद्यार्थ्यांनी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती द्वारा आयोजित वेगवेगळ्या आंतर महाविद्यालयीन क्रीडा स्पर्धात सहभाग घेतला त्यातील क्रीडा प्रकार खालील प्रमाणे.

१. **<u>क्रॉस कंट्री</u>** :-

दिनांक ०६.१०.२०२४ रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत आयोजित अंतर महाविद्यालयील क्रॉस कंट्री (१० किलोमीटर रनिंग) स्पर्धेचे आयोजन अमरावती येथे करण्यात आले होते. आपाल्या लोकमान्य टिळक महाविद्यालयतील ०१ विद्यार्थिनी आपला सहभाग झाली.

२. **<u>ॲथलॅटीक्स</u>** :-

दिनांक १८.१२.२०२४ ते २०.१०.२०२४ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत आयोजित आंतर महाविद्यालयीन ॲथलॅटीक्स स्पर्धेचे आयोजन अमरावती येथे करण्यात आले होते. अशा चार विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला.

३. **क्रिकेट (मुले) :-**

दिनांक ०७.१०.२०२४ ते दि. १८.१०.२०२४ राम मेघे कॉलेज ऑफ इंजीनियरिंग अँड मॅनेजमेंट संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती अंतर्गत आयोजित अंतर महाविद्यालय क्रिकेट मुले स्पर्धेचे आयोजन बडनेरा येथे करण्यात आले त्यात लोकमान्य टिळक महाविद्यालयातील १४ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

४. **व्हॉलीबॉल (मुले) :-**

दिनांक ०४.१०.२०२४ ते दि. ०७.१०.२०२४ संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती अंतर्गत आयोजित अंतर महाविद्यालय व्हॉलीबॉल (मुले) स्पर्धेचे आयोजन नेर परसोपंत महाविद्यालय येथे करण्यात आले त्यात आपल्या महाविद्यालयातील १० विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवला.

५. **कबड्डी (मुले) :-**

दिनांक १४.१०.२०२४ ते २१.१०.२०२४ शिवशक्ती महाविद्यालय संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती अंतर्गत आयोजित अंतर महाविद्यालयीन कबड्डी (मुले) स्पर्धा आयोजित शिवशक्ती महाविद्यालय बाभुळगाव येथे करण्यात आले त्यात आपल्या महाविद्यालयातील १२ विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

६. **कबड्डी (मुली) :-**

दिनांक २८.०९.२०२४ ते ३१.०९.२०२४ श्रीशिवाजी कला आणि वाणिज्य कॉलेज अमरावती येथे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या आंतर विद्यापीठ कबड्डी (महिला) निवड चाचणी अमरावती येथे पार पडली व त्यात आपल्या महाविद्यातील कु. फाल्गुनी कांबळे या विद्यार्थिनीने आपली निवड चाचणी देऊन सहभाग नोंदवला.

७. **क्रीकेट (मुली) :-**

दिनांक २७.१०.२०२४ ते २९.१०.२०२४ मातोश्री विमलाबाई देशमुख महाविद्यालय अमरावती संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती अंतर विद्यापीठ द्वारे क्रिकेट महिला निवड चाचणी

अमरावती येथे पार पडली त्यात आपल्या महाविद्यातील कु. धम्मरुचा दारुंडे, कु. अनुष्का क्षीरसागर, कु. स्वाती लाकडे या विद्यार्थिनींनी आपला सहभाग नोंदविला.

तसेच सत्र २०२४-२०२५ मध्ये आपल्या महाविद्यालयातील संचालक क्रीडा व शारीरिक शिक्षण संचालक प्रा. उमेश स. व्यास हे संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ अमरावती आंतर विद्यापीठ टेबल टेनिस (मुले/ मुली) संघाचे निवड समिती सदस्य म्हणून कार्यरत होते. तसेच महाविद्यालयाचे ग्रंथपाल डॉ. गुलशन कुथे यांची संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या जलतरण क्रीडा प्रकारात विद्यापीठाचा संघ व्यवस्थापक म्हणून निवड करण्यात आली ते दिनांक २१.१२.२०२४ ते २३.१२.२०२४ पर्यंत तामिळनाडू येथे गेले होते.

एकंदरीत आपल्या महाविद्यालयातील सर्व क्रीडा संघातील खेळाडूंनी आपल्या परीने चांगले प्रदर्शन केले. क्रीडा विभागाला महाविद्यालयाकडून प्राचार्य व महाविद्यालयातील पूर्ण संचालक मंडळाकडून पुरवल्या जाणाऱ्या सर्व सोयी सुविधा व मदतीमुळे विद्यार्थ्यांमध्ये खेळाडू वृत्तीचे उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे

धन्यवाद.

वणी

दिनांक

आपला नम्र

उमेश स. व्यास
संचालक
शा.शि. व क्रीडा
लोकमान्य टिळक महाविद्यालय, वणी